आनंदाचे क्षण छोटेसे असतात, पण त्यांची आठवण मोठी असते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २२ जून २०२५ | अंक १८५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# देवेंद्रजी योगीच आहेत-अमृता फडणवीस

आज संपूर्ण भारतासह जगभरातही आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जात असून त्यानिमित्ताने देशातही विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यात 'वारकरी भक्तियोग उपक्रम' आयोजित करण्यात आला होता. दरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात लाखो वारकरी, विद्यार्थी आणि पुणेकऱ्यांसह मिळून योगासनं केली. तर अमृता फडणवीस यांनी मुंबईत योग दिवस साजार केला. त्यावेळी त्यांनी केलेल्या एका विधानाची सध्या चांगलीच चर्चा सुरू आहे. देवेंद्रजी योगीच आहेत पण ... अमृता फडणवीस यांचं विधान काय ? 'देवेंद्रजी हे योगीच आहेत. ते कधीच कसरत करत



नाही. पण ध्यान धारणा करत असतात' अशा शब्दांत अमृता फडणवीस यांनी त्यांच्या फिटनेसवर प्रतिक्रिया दिली. आज 11 वा आंतरराष्ट्रीय दिवस आहे. आम्ही मुंबई महानगर पालिकेच्या कर्मचार्यांसोबत योग दिवस साजरा करत आहोत, असंही अमृता फडणवीस यांनी नमूद केलं. मुख्यमंत्र्यांची पुण्यात वारकऱ्यांसोबत योगासनं जागतिक योगदिनाच्या निमित्ताने राज्य सरकारच्या पुढाकाराने पुण्यात 'वारकरी भक्तियोग उपक्रम' झाला. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह लाखो वारकरी,विद्यार्थी अन पुणेकरांसह योगासनं केली. आम्ही आज वारकऱ्यांसह योगासनं केली, पुण्यातली कॉलेजेसही यात सहभागी झाल्याने भव्य कार्यक्रम झाला. प्राचीन संस्कृती, जीवन पद्धती, चिकित्सा पद्धती, ज्यात फक्त शरीराचा विचार केलेला नाही, मनाचाही विचार केला आहे. ती क्षमता योगात आहे. आज मोदीजींमुळे योगासनांना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वीकारण्यात आलं आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त माणगावमध्ये योग शिबिर महाराष्ट्रातही विविध ठिकाणी योग दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. माणगाव तहसील कार्यालयाच्या सभागृहात तालुका प्रशासन आणि तालुका क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला राज्याच्या मंत्री अदिती तटकरे यांनी प्रमुख उपस्थिती लावली. त्यांनी शिबिरात सहभागी होत विविध योगासने प्रत्यक्ष करून दाखवत उपस्थितांना प्रेरणा दिली. या प्रसंगी तहसीलदार, प्रांताधिकारी, पोलीस अधिकारी आणि इतर शासकीय कर्मचारी उपस्थित होते. योग दिनाच्या निमित्ताने शरीर आणि मनाच्या आरोग्यासाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

# शरीरातील व्याधी नष्ट करायच्या असतील तर राम प्रहरी प्राणायाम,ध्यान,योग करावा - आ.सुरेश धस

समाजातील प्रत्येक घटकातील माणूस आपापल्या कामांमध्ये व्यस्त असल्याने त्याचे मानवी शरीराकडे विशेष लक्ष दिसत नाही. त्यामुळे तो विविध व्याधींनी त्रस्त आहे. म्हणून समाजातील या व्याधी नष्ट करायच्या असतील तर राम प्रहरी अत्यंत प्रामाणिकपणे घराघरांत प्राणायाम, ध्यान, योग केल्याने माणसाचे शारीरिक व मानसिक संतुलन सुदृढ होते. आत्मविश्वास व आयुर्मान वाढते, असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.दि. २१ जून रोजी अनिषा ग्लोबल शैक्षणिक संकुलात आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात आ. धस बोलत



होते. योग प्रात्यक्षिक करण्यासाठी नितीन आळकुटे हे होते. पुढे बोलतांना आ. धस म्हणाले, जागतिक स्तरावर योगाचे महत्त्व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पटवून दिले आहे. सध्याच्या काळात धावपळीचे जीवन झाले आहे. जो माणूस काम करतो त्यांना वेळ पुरत नाही. परंतु हे सर्व करतांना आपण आपल्या शरीराकडे लक्ष देणे गरजेचे असून प्रत्येकांनी आपल्यासाठी एक - दोन तास नियमित देणे गरजेचे असल्याचेही आमदार धस यांनी सांगितले. त्यांनी सर्वांना योगासने करुन दाखवत त्या योगाचे महत्त्व सांगितले. यावेळी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, माजी नगराध्यक्ष भारत मुरकुटे, संजय शिंगवी, डॉ. चंद्रकांत ढेरे, अँड. बाळासाहेब मोरे, इंजि. दत्तात्रय देशमुख, सरपंच अशोक मुळे, आत्माराम फुंदे, शहादेव नरवडे, विजय धनवडे, राजाभाऊ निकाळजे, नगर पंचायतचे सभापती शेख शरीफ, अँड. अविनाश निंबाळकर, किशोर झरेकर, बाबुराव कदम, बाळासाहेब घोडके, दिपक निकाळजे, कपिल अग्रवाल, राजेंद्र लाड यांच्यासह आदि उपस्थित होते. यावेळी योग शिक्षक व प्राणी मित्र नितीन आळकुटे यांचा गौरव आमदार सुरेश धस यांच्याहस्ते करण्यात आला.

# श्रीसंत गजानन महाराजांच्या पालखीचे अंबाजोगाईत भक्तीमय वातावरणात स्वागत

श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचे शनिवारी दुपारी अध्यात्मिक परंपरा लाभलेल्या अंबाजोगाई शहरात आगमन झाले. शहरातील महिला,पुरुष भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.टाळ मृदंगाच्या तालावर शेकडो वारकऱ्यांनी ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम च्या गजरात ठेका धरला. पंढरीनाथ महाराज की जय, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल,संत गजानन महाराज की जय, गण गण गणात बोते या जयघोषात एका पाठोपाठ सु ंदर चालीवर भजने म्हटली जातात प्रस्थानाच्या मार्गावर शहरांमध्ये विविध ठिकाणी श्रीसंत गजानन महाराज पालखीचे उत्स्फूर्तपणे स्वागत आणि पूजा करण्यात आली पंढरपूरकडे मार्गक्रमण करणाऱ्या शेगाव येथील श्रीसंत गजानन महाराजांच्यापालखी सोहळ्याला मोठी अध्यात्मिक परंपरा असून या पालखी सोहळ्यात शेगाव येथून अश्व आणि मोठ्या संख्येने वारकरी सहभागी असून यात काही टाळकरी तर काहींच्या हाती भगव्या पताका आहेत. श्रीसंत गजानन महाराज पालखी सोहळा हा अत्यंत शिस्तबद्ध व विशिष्ट पद्धतीने अध्यात्मिक परंपरा जतन करणारा म्हणून ओळखला जातो. श्री संत गजानन महाराज पालखीचा मुक्काम अंबाजोगाई शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात असून रात्री भजन किर्तन, महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे. रविवारी सकाळी श्रीसंत गजानन महाराज यांच्या पालखीचे पंढरपूरसाठी अंबाजोगाई शहरातून प्रस्थान होईल. यावर्षी प्रथमच जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार गजानन महाराज यांच्या दिंडी समवेत महसुली दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

# महाराष्ट्रातील ७ हजार मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर



सध्या महाराष्ट्रात हिंदी आणि मराठी भाषा शिकवण्यावरून वाद सुरु आहे.अलीकडील काळात मुलांच्या चांगल्या भविष्यासाठी पालक मुलांना इंग्रजी शाळेत शिकायला पाठवतात. या मुळे मराठी शाळांमध्ये दिवसेंदिवस पटसंख्या कमी होत आहे.मुंबईतील शाळा १६ जून पासून सुरु झाल्या असून नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली आहे. गेल्या दोन दिवसांत मुंबईत १३ वर्षात महापालिकेच्या १३ शाळा बंद पडल्या आहे. शाळाच नव्हे तर शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संख्येत देखील कमी आली आहे. राज्यातील ७,४२० सरकारी मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या १० पेक्षा कमी झाली आहे. शिक्षण विभागाच्या जून २०२५ च्या अहवालात हे उघड झाले आहे. २०पेक्षा कमी विद्यार्थ्यांमुळे या शाळा बंद होण्याची शक्यता असल्याने शिक्षक चिंतेत आहेत.म ाजलगांव (प्रतिनिधी) खामगांव पंढरपूर महाम ार्गाजवळ जायकोचीवाडी फाटा येथे आज दि.२१ जून २५ रोजी सकाळी १० वाजता आझाद क्रांती सेनेच्या वतिने न्याय मागण्या साठी भव्य रस्तारोको करण्यात आला. आम्हाला प्यायला स्वच्छ पाणी का नाही ?

# संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात लाडू व बिस्कीट वाटप

पुणे - संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात लाडू व बिस्कीट वाटप करताना लोकशाही पत्रकार संघ,महाराष्ट्र राज्यचे सं. अ. भागवत (बीबी) वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंखे, प्रदेश उपाध्यक्ष अनिस कुरेशी, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती च्या हलीमताई शेख यांच्या आदेशानुसार पुणे येथील जिल्हा कार्याध्यक्ष संजय बाबा सरोदे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) भोसरी विधानसभा अध्यक्ष तसेच महाराष्ट्र बांधकाम अभियंता, कर्मचारी व कामगार संघटना (महाराष्ट्र



राज्य) संस्थापक अध्यक्ष यांच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२५ निमित्त दत्तनगर, दिघी पिंपरी चिंचवड येथे लाडू व बिस्किट वाटप करण्यात आले.
या ठिकाणी पालखीचे उत्साहात स्वागत करण्यात आले. या मंगलमय क्षणी सर्व वारकरी भक्त, पदाधिकारी, नेतेमंडळी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी हरिनामाचा गजर करीत आनंदात पालखी सोहळ्याचा लाभ घेतला.अनेक भाविकभक्त अन्नदान करत असतात.
कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येण्यामागे वारकरी संप्रदायाची सेवा व सामाजिक बांधिलकी ही भावना असल्याचे संजय बाबा सरोदे यांनी सांगितले.




माजलगाव... ज्येष्ठ पत्रकार किशोर प्रधान यांचा वाढदिवस साजरा करताना लोकप्रचाराक चे संपादक द्वारका अर्बन चे चेअरमन दिगंबर सोळंके, बीड लोकरंजन चे संपादक परमेश्वर सोळंके निर्भीड पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष अमर साळवे निर्भीड पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब आडागळे



आज पाली येथील नागनाथ मंदिर येथे पंढरपूर जाणाऱ्या वारकरी भाविक भक्तांसाठी अखंड अन्नछत्र व प्रथमोपचार उद्घाटन सोहळा संपन्न झाला.या उद्घाटन सोहळ्यासाठी ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर तसेच बीड जिल्ह्याचे पोलीस

# सर्व शाळांसाठी नवीन वेळापत्रक लागू !

महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून नवीन वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. कारण राज्यात आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. यावर्षीपासून या नव्या धोरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी होणार असून, त्यानुसार नव्या वेळापत्रकाचीही अंमलबजावणी करण्यात येणार आहे. राज्यातील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सध्याच्या स्थितीनुसार, ५ ऑक्टोबर २०१७ च्या शासन परिपत्रकानुसार पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विषयानुसार तासिकांची विभागणी लागू आहे. मात्र, १६ एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची (न्यू एज्युकेशन पॉलिसी) अंमलबजावणी केली जाणार आहे. हे नवीन धोरण शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच लागू होणार असून,



त्यानुसार तासिका आणि अभ्यासक्रमाच्या रचनेत बदल केले जाणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन शैक्षणिक धोरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू करण्यात येणार आहे. यावर्षी केवळ इयत्ता पहिलीसाठी हे नवे धोरण लागू होणार आहे. त्यानुसार पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नव्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी देखील यंदाच्या वर्षीपासून केली जाणार आहे. या नव्या धोरणानुसार पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी सुधारित शालेय वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने सर्व माध्यमांच्या शाळांसाठी इयत्ता पहिली व दुसरीसाठी हे सुधारित वेळापत्रक लागू करण्यात आले आहे.शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १८ जून २०२५ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार, नव्या शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेले सुधारित वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. या वेळापत्रकात विषयवार तासिकांची स्पष्ट विभागणी करण्यात आली असून, नवीन अभ्यासक्रमाला अनुसरून ते रचण्यात आले आहे. नवीन वेळापत्रकानुसार, संपूर्ण शालेय वर्षात एकूण ३६५ दिवसांपैकी २१० दिवस हे अध्ययन अध्यापनासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यासाठी ३५ आठवड्यांचा अभ्यासकाल निश्चित करण्यात आला आहे. उर्वरित दिवसांमध्ये परीक्षा, मूल्यांकन आणि सहशालेय उपक्रम राबवले जाणार आहेत. त्यामध्ये परीक्षा व अनुषंगिक कृतीसाठी १४ दिवस, सहशालेय उपक्रमांसाठी १३ दिवस, आणि रविवार व इतर सुट्ट्यांसह एकूण १२८ दिवस सुट्टीचे नियोजन करण्यात आले आहे. शाळांचा अध्यापन कालावधी सर्व शाळांसाठी एकसमान ठेवण्यात आला असून, परिपाठ, मधली सुट्टी आणि समृद्धीकरण तासिकांमध्ये वेळेच्या उपलब्धतेनुसार थोडाफार फरक असू शकतो, असे शासनाने स्पष्ट केले आहे.या नव्या वेळापत्रकात गणित, पर्यावरण, भाषा, आरोग्य शिक्षण व कलाशिक्षण यांसारख्या विषयांना समप्रमाणात वेळ देण्यात आला आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल.सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये एकसंध अभ्यास आराखडा लागू करण्याचा उद्देश या वेळापत्रकामागे असून, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाचा समतोल राखण्यास मदत होईल. शालेय जीवन अधिक गुणवत्तापूर्ण आणि शिस्तबद्ध व्हावे, या उद्देशानेच हा निर्णय घेण्यात आल्याचे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शनिवार २१ जून २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### जमीन सार्वजनिक ठेवा

आरक्षित जागांवर उभारण्यात येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये ३५ टक्के जमीन ही उद्यान-मैदाने अशा सार्वजनिक वापरासाठी मोकळी ठेवण्याचा आदेश देऊन मु ंबई उच्च न्यायालयाने सार्वजनिक हितासाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. आरक्षित जागांवर उभारण्यात येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये ३५ टक्के जमीन ही उद्यान-मैदाने अशा सार्वजनिक वापरासाठी मोकळी ठेवण्याचा आदेश देऊन मु ंबई उच्च न्यायालयाने सार्वजनिक हितासाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. ङ्गविकास की मोकळा श्वासफ असा निरर्थक वाद निर्माण करू पाहणाऱ्यांच्या डोळ्यांत न्यायालयाच्या या आदेशाने नेमकेपणाचे अंजन घातले; तसेच पर्यावरणाचे रक्षण, सार्वजनिक आरक्षणांचे महत्त्व आणि शाश्वत विकास यातील सीमारेषाही स्पष्ट केल्या आहेत. न्या. अमित बोरकर आणि न्या. सोमसेखर सुंदरेसन यांच्या खंडपीठाने दिलेला हा आदेश मु ंबईसंदर्भात असला; तरी राज्यातील अन्य शहरांमधील विकास प्रकल्पांवरही त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. मु ंबईच्या विकास आराखड्यात उद्याने व मैदानांसाठी आरक्षित जागांवर अतिक्रमणे होऊन झोपडपट्ट्या झाल्या. तेथे राबविण्यात येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनांमध्ये मूळ आरक्षणाच्या उद्देशांची पूर्तता करण्याबाबत विकास आराखड्यात करण्यात आलेल्या तरतुदीला आव्हान देण्यात आले होते. याबाबत आदेश देताना खंडपीठाने उद्याने मैदानांसाठी आरक्षित जागांवरील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामध्ये एकूण जागेपैकी ३५ टक्के सलग जागा सार्वजनिक वापरासाठीच आरक्षित ठेवण्यात यावी, असे स्पष्ट बजावले आहे. त्यापलीकडे जाऊन तेथे मैदाने-उद्याने विकसित होतात की नाही, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत देखरेख ठेवावी आणि तिमाही अहवालही देण्यात यावा, असे सांगून न्यायालयाने जबाबदारीही निश्चित केली आहे. त्याशिवाय मोकळ्या जागेबाबतच्या आदेशाची पूर्तता होत असेल, तर प्रकल्प आराखडा मंजूर करावा आणि अशा प्रकल्पांमध्ये इमारतींचे प्रमाण ६५ टक्क्यांहून अधिक झाले, तर संबंधितांवर कारवाई करावी; तसेच आरक्षणानुसार ङ्गग्रीन लँडस्केपिंगफ, जॉगिंग ट्रॅक , खेळाची-व्यायामाची साधने, मुलांसाठी खेळणी आणि सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था असावी, असा बारिकसारीक तपशीलाचा विचारही न्यायालयाने केल्याचे आदेशातून दिसून येते. घटनेच्या २२६ आणि ४८-अ या कलमांच्या आधारे न्यायालयाने दिलेला आदेश अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. कलम २२६नुसार नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याबाबत उच्च न्यायालयास विशेषाधिकार देण्यात आले असून त्याआधारे न्यायालय सरकारी कृतींवर देखरेखही ठेवू शकते. कलम ४८-अ पर्यावरण; तसेच वने आणि वन्यजीवांचे रक्षण करण्यासंदर्भातील सरकारी कर्तव्ये स्पष्ट करते. ताज्या निकालाच्या आधारे न्यायालयाने नगर नियोजनातील मोकळ्या जागांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. ङ्गजागा दिसली, की इमारती उभारण्याचा सपाटा म्हणजेच विकास,फ अशी काहीशी व्याख्या बदलत्या काळात प्रस्थापित होऊ पाहत आहे, तिला या आदेशाने छेद दिला आहे. मु ंबईसारख्या शहरांमध्ये मोकळ्या जागा औषधापुरत्याच शिल्लक आहेत

# राष्ट्रीय महामार्गातील दोन टप्प्यांसाठी ४२१ कोटींची कामे मंजूर

## खा.बजरंग सोनवणेंनी करून दाखविले, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले सोनवणेंच्या पाठपुराव्याला पाठबळ

बीड: जिल्ह्यातून अनेक राष्ट्रीय महामार्ग गेले असून वाहतुकीच्या दृष्टीने माजलगाव ते केजमधील धारूर जवळचा घाट ब्लॅकस्पॉट ठरला होता. शिवाय लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्त्यातील उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची बाबही महत्वाची होती. याबाबत खा.बजरंग सोनवणे यांनी वारंवार पाठपुरावा केला आणि या पाठपुराव्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पाठबळ देत ४२१ कोटींची ही दोन्ही कामे सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित केली आहेत.राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८(सी) माजलगाव ते केजमधील धारुर जवळच्या घाट अरुंद असून चढ जास्त असल्यामुळे वारंवार अपघात होत होते, तसेच प्रवासात वेळ लागत होता. हा घाट ब्लॅकस्पॉट म्हणूनही जाहिर करण्यात आलेला आहे. ही बाब विचारात घेऊन बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी धारुर घाटातील रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून थेटेगव्हाण मार्गे कमी



चढाईचा व अधिक रुंदीचा चौपदरी रस्ता करण्यासाठी जुलै २४ पासून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडे व रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे सतत पाठपुरावा केला. सन २५/२६ चा कृति आराखडा व वार्षिक नियोजनात सदरील काम घेण्यात आले असून या ११ कि.मी रस्त्यासाठी तब्बल १७१ कोटी रुपये खर्च प्रस्तावित केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून धारुर घाटातील वाहतुक समस्या सोडवण्यासाठी आग्रही मागणी होत होती. घाटामधे चढ जास्त असल्यामुळे जड वाहतुक लांबच्या मार्गाने करावी लागत होती. अरुंद रस्त्यामुळे घाटामधे अपघाताचे प्रमाण वाढले होते. हे काम पूर्ण झाल्यास शेगाव ते पंढरपूर रस्ता वाहतुक सुरळीत होईल. माजलगाव, वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांची शेतीमाल वाहतुक सुलभ होणार आहे. या सोबतच लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्ता या उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची मागणी करण्यात आली होती. हे २५० कोटी रुपये अंदाजित किंमत असलेल्या १८ कि.मीचे काम सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित करण्यात आले असून दोन्ही कामे करण्यास उच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय महामार्गात येणारे अडथळे आणि महत्वाच्या विषयाकडे लक्ष घातलेले आहे. धारूर घाटातील ब्लॅकस्पॉटवर अनेकदा अपघात होवून बळी गेलेले आहेत. परिणामी, अनेक संसार उघड्यावर पडलेले आहेत. आता याठिकाणी पर्यायी मार्ग काढून येथील अपघात टाळण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले आहे.

### या कामांसाठीही सुरू आहेत प्रयत्न

अहमदपूर ते पिंपळा धायगुडा, धायगुडा पिंपळा ते लोखंडी सावरगाव व लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा या रस्त्यांचे चौपदरीकरणाचे प्रस्ताव समितीकडून मंजुरी करुन घेऊन त्या कामांनाही प्राधान्याने मंजुरी घेण्यात येईल.

मंजुरी देण्यात आलेल्या दोन्ही कामाच्या निविदा लवकरच होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. केंद्रीय रस्ते वाहतूक व दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून त्याबद्दल मी जिल्ह्याच्या वतीने त्यांचे आभार मानतो.
**-खा.बजरंग सोनवणे, बीड.**

# योग दिन उत्साहात साजरा ताण तणावापासून मुक्त राहण्यासाठी योगासने करणे महत्त्वाचे -जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन



बीड, दि.२१ :- धकाधकीच्या जीवनात ताणतणावातून तणावमुक्त राहण्यासाठी शारीरिक व मानसिक क्षमता कायम राहावी यासाठी दररोज योगासने करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. योग हा पारंपारीक पद्धतीने पाच हजार वर्षापासून चालत आला असून पूर्वी वडीलधारी मंडळी योगाच्या माध्यमातून स्वतःला निरोगी व तणावमुक्त ठेवण्यासाठी योगासने, ध्यान साधना करत असत. विद्यार्थ्यांना आपले ध्येय साध्य करण्यासाठी व एकाग्रता साधण्यासाठी ध्यान धारणा (मेडीस्टेशन) करणे ही काळाची गरज झाली असून शारिरीक व मानसिक स्वास्थ्य निरोगी ठेवण्यासाठी ध्यान साधनेचा जीवनात नियमित उपयोग करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी आणि उपस्थित नागरिकांना केले. जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा शिक्षण विभाग, विविध योग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे इनडोअर हॉलमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय योगदिनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलतांना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येतो. माणसाच्या जीवनात योगाचे अत्यंत महत्त्व असून आजची आपली जीवनशैली बदलल्यामुळे तरूण पिढी नेहमीच तणावाच्या वातावरणात वावरत असते. यापासून मुक्त राहण्यासाठी योगासारखे दुसरे माध्यम नाही. प्रत्येक नागरीकांनी योगा केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासासाठी शाळा व महाविद्यालयातील तरूणाने योगा केला पाहिजे असेही त्यांनी यावेळी सांगितले. योग दिनाचे औचित्य साधून बीड जिल्हयातील राष्ट्रीय खेळाडू राधा वझे, सुभाषिणी वझे, शिवाजी घोडके व राधा तांबे यांचा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी योगगुरू विनायक वझे, विकास गवते, राधा तांबे यांनी उपस्थितांकडून योगासने करून घेतले. प्रोटोकॉलनुसार योगा कार्यक्रम संपन्न होत असतांनी शेवटी पूर्णवाद स्पोर्टसब ॲण्ड हेल्थ प्रमोशन अकॅडमी, बीड च्या योग खेळाडू यांनी व शिवाजी घोडके, राधा तांबे यांनी योग प्रात्यक्षिकांचे प्रदर्शन केले. या योग दिनाच्या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वासुदेव सोळंके, निवासी उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, तहसिलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे, जिल्हा कोषागार अधिकारी लहु गळगुंडे, जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, शिक्षणाधिकारी माध्य. विभाग, संजय पंचगल्ले, प्रियाराणी पाटील, प्राथमिक विभाग, भगवान फुलारी जिल्हा आयुष अधिकारी, आनंद कुलकर्णी, पुरूषोत्तम पिंगळे, कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग रविंद्र तोंडे, जेष्ठ क्रीडा संघटक तथा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी प्रा.जे.पी. शेळके, उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, भगवान सोनवणे, रंगनाथ राऊत, सहाय्यक जिल्हा उपनिबंधक अशोक कदम, जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, विविध कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी शहरातील शाळा, महाविद्यालय विद्यार्थी, क्रीडा संघटक, नागरिक, खेळाडू, पत्रकार, व्यवसासिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. योग दिनाचे यशस्वी आयोजन होणे कामी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांचे मार्गदर्शनाखाली क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसूरकर, क्रीडा मार्गदर्शक सतिष राठोड, अविनाश पाटील, रेवननाथ शेलार, जितेंद्र आराक, धनेश करांडे, प्रिती काळे, मंगेश वडमारे, गणेश वीर यांनी परिश्रम घेतले.

# आमचा महसूल चालतो मग आम्हाला रस्ता का नाही ? आझाद क्रांती सेनेचा सरकाला सवाल

माजलगांव (प्रतिनिधी) खामगांव पंढरपूर महामार्गाजवळ जायकोचीवाडी फाटा येथे आज दि.२१ जून २५ रोजी सकाळी १० वाजता आझाद क्रांती सेनेच्या वतिने न्याय मागण्या साठी भव्य रस्तारोको करण्यात आला. आम्हाला प्यायला स्वच्छ पाणी का नाही ? आमच्या गावच्या शाळेला दर्जेदार शिक्षण का नाही ? शेतकऱ्यांना कर्जमाफी का नाही. गेली ३५ वर्षापासून जायकोचीवाडीचा रस्ता अद्यापपर्यत झालेला नाही शाळेतील विद्यार्थी, अबलावृद्ध, गर्भवती महिला, यांच्यासह गावकऱ्यांना दळणवळणा साठी रस्ता नसल्यामूळे नागरिकांमध्ये चिड निर्मान झाली असून रस्त्यासाठी संघर्ष करावा लागत आहे रस्त्याचे काम तात्काळ सुरू न केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन आझाद क्रांती सेनेच्या वतीने करण्यात येईल असा इशारा याप्रसंगी देण्यात आला या आंदोलनामध्ये आझाद क्रांती सेना प्रमूख राजेशजी घोडे,ता.प्रमूख अशोक ढगे,किसन भिसे, उद्धव वाकणकर,अकाश हतागळे,राहूल गायकवाड,संजय हिवाळे,अरूण पिसूळे,भारत गायकवाड, गणेश कांबळे, पांडुरंग कांबळे, अशोक गायकवाड ( मन्या), सुनील कांबळे, सुनील खंडागळे, सुरेश घोडे, बप्पा सुरवसे, दादाराव थोरात, व समस्त गावकरी महिला यांची लक्षणीय उपस्थीती होते




# बीड तालुक्यातील जाधववाडीतील सुमित बनणार पहिला डॉक्टर

## रिक्षातून स्वप्नांच्या रुग्णालयात सुमीत बरदाडेची प्रेरक यशोगाथा




बीड प्रतिनिधी :- स्वप्नं मोठी पाहायची, कारण तीच आपल्याला आयुष्याच्या पुढच्या थांब्यावर पोहोचवतात.. कधी कधी, मोठ्या शहरात नाही, तर एखाद्या छोट्याशा गावात एक मोठं स्वप्न उगवतं... जसं नाव जाधववाडी. बीड तालुक्यातील च-हाटा ग्रामपंचायतीमधील हे छोटंसं, पण जिद्दी स्वप्न असलेलं गाव. आणि इथलंच एक तेजस्वी स्वप्न म्हणजे सुमीत संजय बरदाडे. सुमीतचे वडील संजय बरदाडे यांचे शिक्षण बारावीपर्यंत. आई अर्चना ताईचं शिक्षण दहावीपर्यंत. घरात शेती थोडीशीच. जगायचं कसं? तर वडील दिवसभर आपल्या आप्पे रिक्षावर लोकांना ने-आण करत राहतात. स्वप्न कोणतं होतं? घरातला मुलगा एक दिवस डॉक्टर व्हावा... शेवटच्या गावातल्या रुग्णालाही हाक मारणारा, दिलासा देणारा डॉक्टर. कदाचित रिक्षाच्या आवाजातच सुमीतने जिद्द ऐकली... आणि वडिलांच्या घामातच स्वतःचं भवितव्य पाहिलं. शाळा गावी, अभ्यास मनापासून केला. सुमीतचं शिक्षण सुरू झालं जि.प. प्राथमिक शाळा, जाधववाडी इथून. पाचवीपर्यंत त्याने गावातच शिक्षण घेतलं. सहावीसाठी गेला च-हाटा येथील महात्मा फुले विद्यालयात. सातवी ते दहावी झाली श्री शिवाजी विद्यालय, बीडमधून १० वीला ९५.४० टक्के गुण मिळवले. ग्रामीण भाग, मराठी माध्यम, साधी शाळापण अभ्यास ? प्रामाणिक आणि एकाग्र. दहावीत असं जबरदस्त यश मिळवलं. सुमीतने बारावी केली पाटोदा हायस्कूल, बेलखंडी, पाटोदा येथून. ११वी-१२वी मध्ये ८५ टक्के गुण मिळाले. इथेही त्याने आपली गुणवत्ता टिकवली. एका ग्रामीण मुलाचा संघर्ष, हळूहळू यशात बदलत गेला. वैद्यकीय प्रवेश पूर्व परीक्षा छएएढ या परीक्षेत - ५११ गुण मिळवून ग्रामीण भागात शिकून डॉक्टर होता येतं का? हा प्रश्न विचारणाऱ्यांना आज तो एक उत्तर बनला आहे. छएएढ परीक्षेत ५११ गुण मिळवत ११ खपवळर ठरपज्ञ: ४०,१२५ अशी आहे. तर आर्थिक दुर्बल घटकातून ४८८८ रैंक मिळवली आहे. महाराष्ट्रातील इ.एस.बी.सी. (मराठा आरक्षण) याची रैंक आणखी वर जाईल. ही रैंक फक्त संख्या नाही, ही घरातून रिक्षात बसून कॉलेजकडे निघालेल्या स्वप्नांची चाल आहे.

## 'योगा' ने दिले जगण्याचं बळ - प्रिया मुंडे



ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहाने आणि समर्पणाने साजरा केला. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन प्रसिद्ध पॉवर योगा प्रशिक्षक श्रीमती प्रिया मंगेश मुंडे यांनी केले. श्रीमती मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योग आसने आणि श्वासोच्छवासाच्या व्यायामात भाग घेतला, ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्याला चालना मिळाली. या उत्सवाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये समग्र विकासाला चालना देणे आणि निरोगी सवयी रुजवणे हा होता. शाळेने आपल्या उपक्रमांमध्ये योगाचा समावेश करण्याच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वचनबद्धता अधोरेखित केले. पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना योगाचे उत्तम असे मार्गदर्शन केल्यामुळे पब्लिक स्कूलच्या प्राचार्यांनी आणि सगळे शिक्षकांनी श्रीमती प्रिया मंगेश मुंडे यांचे आभार व्यक्त केले.

## नोंदणी व मुद्रांक विभाग, दुय्यम निरीक्षक कार्यालय (श्रेणी-1)
## पैठण — घाणीचे साम्राज्य आणि दुर्लक्षित सुरक्षितता!





प्रतिनिधी, पैठण: नोंदणी व मुद्रांक विभागाच्या दुय्यम निरीक्षक (श्रेणी-१) कार्यालय, पैठण या ठिकाणी दररोज लाखो रुपयांची आर्थिक उलाढाल होते, तालुकाभरातून नागरिक शेती व्यवहार, खरेदीखत, व इतर नोंदणीसाठी येथे गर्दी करतात. मात्र, या अत्यंत महत्त्वाच्या शासकीय कार्यालयाच्या परिसरात विदारक अस्वच्छतेचे चित्र पाहायला मिळत आहे. कार्यालयाच्या आजूबाजूच्या भागात पावसाचे पाणी साचून छोटे छोटे डबके तयार झाले आहेत, जेथून मोठ्या प्रमाणात डासांचे व मच्छरांचे उत्पादन होते आहे. यामुळे परिसरात डेंग्यू, मलेरिया सारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. याशिवाय, घनकचऱ्याचे ढीग जागोजागी पडून आहेत. हे सर्व पाहता, कार्यालय परिसरात आरोग्य आणि स्वच्छतेचा पूर्ण अभाव असल्याचे चित्र स्पष्ट होते. यात अधिक चिंताजनक बाब म्हणजे — या परिसरात कोठेही सीसीटीव्ही कॅमेऱ्याची व्यवस्था नाही, जे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत गंभीर बाब आहे. येथे नियमितपणे मोठ्या आर्थिक व्यवहार होतात, नागरिकांची सतत वर्दळ असते, परंतु कोणताही सुरक्षा बंदोबस्त, नियंत्रण यंत्रणा अथवा दूरदृष्टीने विचारलेली व्यवस्था दिसून येत नाही. ही सर्व परिस्थिती पाहता, नोंदणी व मुद्रांक विभागाचे संबंधित अधिकारी, तसेच पैठण नगरपरिषद स्वच्छता विभागाचे कर्मचारी यांचे या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष हे लोकांच्या सुरक्षिततेस व आरोग्यास धोका निर्माण करणारे ठरते. प्रजा-शासनच्या वतीने संबंधित प्रशासनाकडे जोरदार मागणी करण्यात येते की — कार्यालय परिसरात तत्काळ स्वच्छता मोहिम राबवण्यात यावी साचलेले पाणी काढून कीटकनाशक फवारणी करण्यात यावी सीसीटीव्ही कॅमेरे लावून सुरक्षा यंत्रणा सक्षम करावी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात लोकहिताच्या दृष्टिकोनातून, हे कार्यालय केवळ नोंदणी व्यवहाराचे केंद्र नसून शासन व जनतेमधील एक महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे या ठिकाणच्या दैनंदिन व्यवस्थापनात तातडीने सुधारणा होणे आवश्यक आहे.

# मुलगा जिवंत हवा असेल तर आता ५० हजार देण्याची मागणी



बीड /प्रतिनिधी बीडमध्ये गुन्हेगारीच्या अनेक घटना वारंवार समोर येत आहेत. पैशांच्या वादातून हाणामारी, दिवसाढवळ्या होणाऱ्या हत्या, किरकोळ वादावादीतून जीवे मारण्याचा प्रयत्न, मारहाणीच्या गंभीर घटना घडत असतानाच बीडच्या धारूरमध्ये पैशांसाठी पुन्हा एकदा अपहरण झालं आहे. धारूरमध्ये उसने पैसे वसूल करण्यासाठी चार तरुणांनी एका तरुणाचे अपहरण केलं. मुलाच्या घरी फोन करून मुलगा जिवंत हवा असेल तर आताच्या आता ५० हजार रुपये टाका अन्यथा मुलगा तुम्हाला परत दिसणार नाही अशी धमकी दिली. हा प्रकार समोर आल्यानंतर पुन्हा एकदा जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात धारूर पोलिसांनी दोघांना अटक करण्यात आली आहे बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात एक धक्कादायक गुन्हा उघडकीस आला आहे. अवघ्या १० हजार रुपयांच्या उसनवारीवरून तब्बल ८० हजार रुपयांची वसुली करत एका तरुणाचे अपहरण केल्याची घटना समोर आली आहे. आरोपींनी थेट तरुणाच्या आईला फोन करून धमकी दिली- मुलगा जिवंत पाहिजे असेल तर ५० हजार पाठवा, नाहीतर तो कधी दिसणार नाही. ही घटना गुरुवारी सायंकाळी घडली असून अपहरण झालेल्या तरुणाचे नाव कृष्णा मैंद असे आहे. कृष्णाने काही महिन्यांपूर्वी धनराज चाटे, पृथ्वीराज राग आणि परमेश्वर आगाव यांच्याकडून १० हजार रुपये उसने घेतले होते. मात्र, आरोपींनी या रकमेवर दिवसाला १ हजार रुपयांचे व्याज लावले होते. याच हिशेबाने व्याजाची रक्कम ८० हजारांवर गेली. पैसे मिळवण्यासाठी कृष्णाचे अपहरण करण्यात आले. अपहरण केल्यानंतर आरोपींनी कृष्णाच्या आईला फोन करून ५० हजार रुपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास मुलाला सोडणार नाही, अशी थेट धमकी देण्यात आली. घाबरलेल्या आईने तात्काळ पोलिसांशी संपर्क साधला. या प्रकरणात धारूर पोलिसांनी तातडीने तपास करत अंबाजोगाई जवळील साकुर येथून दोघांना अटक केली आहे. तर दोघेजण फरार आहेत. कृष्णा मैंद असे अपहरण झालेल्या युवकाचे नाव असून त्याच्यावर सध्या अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कृष्णा याने धनराज चाटे पृथ्वीराज राग व परमेश्वर आगाव यांच्याकडून पैसे उसने घेतले होते त्याचे व्याज दिल्याचे कारण सांगत या तिघांसह अन्यकाने कृष्णाचे अपहरण केले होते. या प्रकरणात धारूर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# निरोगी मन व शरीरासाठी योगासन व आहाराचे नियोजन आवश्यक - डॉ. गजानन रुद्रवार

माजलगाव प्रतिनिधी २१ जून २०२५
निरोगी मन व शरीरासाठी योगासन व आहाराचे योग्य नियोजन आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ गजानन रुद्रवार यांनी केले. येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात क्रीडा व योग विभागाच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड,तसेच मंचावर केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, संयोजक डॉ. उमेश साडेगावकर उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, योग्य व सात्विक आहार तर आपल्या निरोगी शरीरासाठी आवश्यक आहेच परंतु त्यासोबतच योग, प्राणायाम, ध्यानधारणा देखील आपल्या शरीरासाठी तितकीच आवश्यक आहे. म्हणून आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वैश्विक स्तरावर योगाला महत्त्व प्राप्त करून दिले आहे. म्हणून फक्त योग दिवसाच्या निमित्तानेच नाही तर दररोज प्रत्येकाने योगासने व प्राणायाम आपल्या शरीराच्या तंदुरुस्तीसाठी केले पाहिजे.आपण याचे महत्त्व जाणले आहे. ज्या व्यक्तीची प्रतिकारशक्ती चांगली असते त्याच्या शरीरामध्ये कोणताही आजार प्रवेश करत नाही आणि आपली प्रतिकार शक्ती जर वाढवायची असेल तर योगा व प्राणायाम हा नियमित केला पाहिजे असे ते म्हणाले.

याप्रसंगी शुभेच्छापर मनोगत व्यक्त करताना केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे म्हणाले की, महर्षी पतंजली यांनी पाच हजार वर्षांपूर्वी योग व प्राणायामाचा जो परिपाठ घालून दिला आहे तो आपली संस्था आपल्या संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी नित्यनियमाने पार पाडत आहे. नित्य नियमित योगा व प्राणायाम केल्याने आपले मन मेंदू आणि मनगट बळकट होते व आपल्या शरीरामध्ये कोणताही आजार प्रवेश करत नाही म्हणून प्रत्येकाने नियमितपणे योगासने करावीत असे ते म्हणाले.









अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड म्हणाले की, योगा हा आपल्या व्यक्तिमत्व विकासाचा महत्त्वाचा मार्ग आहे. आणि आपले व्यक्तिमत्व जर सुधारायचे असेल तर प्रत्येकाने वैयक्तिक आळस न करता नित्य नियमित योगाकडे वळले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनामध्ये पैशाला महत्त्व न देता आपल्या शारीरिक संपत्तीला महत्त्व दिले पाहिजे. तीच मोठी संपत्ती आजच्या जगात आहे असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले. याप्रसंगी डॉ. कमलकिशोर लड्डा, प्रा.सुरेशचंद्र नेळगे, डॉ. उमेश साडेगावकर यांनी सर्व शिक्षक कर्मचारी यांना योगा व प्राणायामाची प्रात्यक्षिके करून दाखवली.

# गौ शाळेस देणगी व चारा देऊन युवा उदयोजक प्रल्हाद सोळंके, सारंग सोळंके यांचा वाढदिवस साजरा

माजलगाव (प्रतिनिधी) वाढदिवस म्हटलं की खूप मोठा बडे जाव केला जातो पार्ट्या आणि पैशाची उधळपट्टी ही मोठ्या प्रमाणात केली जाते मात्र सादोळा येथील युवा उद्योजक जोडी प्रल्हाद सोळंके, व सारंग सोळंके यांनी युवा पिढीला आदर्शवत असा वाढदिवस साजरा केला देवखेडा येथील गो शाळेत जाऊन गाईसाठी हिरवा चारा व गोशाळेसाठी प्रत्येकी अकराशे रुपयाची देणगी देऊन आपल्या मित्र कंपनीसोबत एकदम साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला वाढदिवस साजरा करण्यासाठी जो बडेजावं केला जातो पार्ट्या दिल्या जातात, पैशांची उधळपट्टी केली जाते या सर्व गोष्टीला फाटा देऊन सादोळा येथील प्रल्हाद सोळंके, सारंग सोळंके या युवा उद्योजक जोडीने तरुण पिढीसमोर नवा आदर्श ठेवत वाढदिवस साजरा केला देवखेडा येथील गौ पालन करणाऱ्या गो शाळेत या उद्योजकांनी आपल्या मित्रांना सोबत घेतले तेथील गाई आणि जनावरांसाठी हिरवा चारा घेतला आणि एकमेकांना केक भरून किती नासाडी करण्याऐवजी मुक्या जनावरांच्या हिरव्या चाऱ्याचा घास भरून आपला वाढदिवस साजरा केला यावेळी त्यांच्यासोबत सादोळा येथील संजय सोळंके, विशाल सोळंके, सुनील सोळंके, अक्षय सोळंके कुलदीप सोळंके, सचिन सोळंके, श्रीकांत ढगे यांच्यासह बहुसंख्या मित्र कंपनी उपस्थित होती युवा उद्योजक असूनही या दोघांनी साधेपणाने वाढदिवस साजरा केल्यामुळे या युवा उद्योजक जोडीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे





# ॐआरोग्याची वारी पंढरी दारी परळी तालुका आरोग्य विभागाचा स्तुत्य उपक्रम
# संतश्रेष्ठ गजानन महाराज पालखीतील वारकर्यांची केली आरोग्य तपासणी

आषाढीवारी ही महाराष्ट्राची एक महान आणि पवित्र परंपरा आहे, ज्यात लाखो वारकरी पंढरपूरकडे पायी चालत जातात. या लाखो वारकर्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी दरवर्षी राज्य सरकार, आरोग्य विभाग आणि विविध स्वयंसेवी संस्था महत्त्वाच्या आरोग्य सेवा पुरवत असतात. आरोग्याची वारी, पंढरीच्या दारीफ उपक्रमः राज्य सरकारने ॐआरोग्याची वारी, पंढरीच्या दारीफ हा विशेष उपक्रम सुरू केला आहे, ज्या अंतर्गत परळी तालुका आरोग्य विभागामार्फत वारकर्यांना उत्तम आरोग्य सेवा आणि आरोग्य तपासणी आदी सुविधा पुरवल्या जात आहेत. संत श्रेष्ठ गजानन महाराज पालखी मार्गावर आणि मुक्कामाच्या ठिकाणी असलेल्या परळी वैद्यनाथ या प्रभू वैद्यनाथाच्या पावन भूमीत आरोग्य विभागाचे हजारो कर्मचारी, डॉक्टर्स आणि स्वयंसेवक सर्वच पालखी सेवेकरी यांच्यासाठी अतोनात प्रयत्नशील असतात. शासकीय रुग्णालयातील कर्मचारी हे देखील वारकर्यांची आरोग्य तपासणी करतात आणि आवश्यक उपचार देतात ज्यामध्ये महिला वारकर्यांसाठी, विशेषतः गरोदर माता आणि लहान मुलांसाठी, हिरकणी कक्ष उभारले जातात. येथे स्त्रीरोगतज्ज्ञ आणि इतर आवश्यक सेवा उपलब्ध असतात. दिंडी प्रमुखांना औषधांचे कीट उपलब्ध करून दिले जातात, जेणेकरून सामान्य आजारांवर तात्पुरते उपचार करता येतील. पालखी



मार्गावरील पाणी स्रोतांचे सर्वेक्षण आणि निर्जंतुकीकरण केले जाते, तसेच हॉटेल आणि धाब्यांवरील कामगारांची आरोग्य तपासणी केली जाते. यामुळे साथीच्या रोगांचा प्रसार रोखण्यास मदत होते. या सर्व आरोग्य विषयक जनजागृती आणि मदतकार्यकरीता आरोग्य ची वारी पंढरीचा दारी, अंतर्गत गुरुवार दि १९ रोजी परळी तालुक्यात श्री गजानन महाराज यांची पायी दिंडी पालखी चें आगमन झाले. त्यावेळी आरोग्य विभाग मार्फत सर्व संत वारकरी यांचे आरोग्य विषयक विचारणा व प्राथमिक उपचार केले. तसेच आरोग्य विषयक जनजागृती कारणासाठी चें फलक लावण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी परळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.लक्ष्मण मोरे, वैद्यकिय अधिकारी डॉ.अश्विनी काकडे, सामुदायिक आरोग्य अधिकारी मोनाली राठोड, आरोग्य सहाय्यक शरद चव्हाण, आरोग्य सेवक रोशन वाढके, संतोष शिंदे, स्टाफ नर्स वैद्य एस.एम., श्रीमती राठोड एस.आर., आरोग्य सेविका श्रीमती भंडारे ए.आर, श्रीमती कराड के.पी., श्रीमती येमले आर.आर, श्रीमती सुवर्णा जंगले आदींनी वारकर्यांची आरोग्य तपासणी मोहिम राबविण्यासाठी परिश्रम घेतले.

# योग हा सनातन धर्माचा सार, आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त रामदेव बाबाचे भाष्य

आज जगभरात मोठ्या उत्साहात 11 वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. हरियाणातील कुरुक्षेत्र येथे बाबा रामदेव यांच्या मार्गदर्शनाखाली योग सत्र आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम पतंजली योगपीठ, हरियाणा योग आयोग आणि हरियाणाच्या आयुष विभागाने आयोजित केला होता. या योग सत्राला हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी, रामदेव बाबा आणि आचार्य बालकृष्ण हे उपस्थित होते, यावेळी एक लाखाहून अधिक लोकांना एकाचवेळी योगसाधना केली. बाबा रामदेव यांनी यावेळी सांगितले की, 'पतंजली योग समितीद्वारे भारतातील सर्व 650 जिल्ह्यांमध्ये मोफत योग प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. या वर्षीचा योग दिनाचा विषय "एक पृथ्वी, एक आरोग्य" होता. योग ही एक जागतिक चळवळ बनली आहे आणि जगभरात २ अब्जाहून अधिक लोक त्याचा अभ्यास करत आहेत. योग हा सनातन धर्माचा सार आहे, जो आपल्या परंपरा आणि निसर्गात रुजलेला आहे.' जागतिक स्तरावर योगाचा प्रचार केल्याबद्दल आणि



सर्व नेत्यांना योगाचा प्रचार करण्यास प्रोत्साहित केल्याबद्दल रामदेव बाबांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख 'योगी योद्धा' असे केले. पुढे बोलताना रामदेव बाबा म्हणाले की, "पंतप्रधान, राष्ट्रपती, गृहमंत्री आणि संरक्षण मंत्री हे सर्व नेते योगाचा सराव करतात, यामुळे योगाचे महत्व लक्षात येते. योगामुळे देशाचा आरोग्यसेवा खर्च कमी होऊ शकतो, जो सध्या दरवर्षी 10 लाख कोटी रुपये आहे. जर देशातील प्रत्येकाने योगाचा सराव केला तर हे आरोग्य बजेट शून्यावर आणता येईल". आपल्या भाषणात पुढे बोलताना रामदेव बाबांनी योगाला भारताच्या आर्थिक स्वातंत्र्याशी देखील जोडले. तसेच उपस्थित नागरिकांना स्वदेशी उत्पादने वापरण्याचे आवाहन केले. पतंजली त्यांच्या 'प्रोस्परिटी फॉर चॅरिटी' मोहिमेअंतर्गत देशाची सेवा करण्यासाठी नफ्याच्या 100 % योगदान देते अशी माहितीही रामदेव बाबांनी दिली. आचार्य बालकृष्ण यांनी बोलताना म्हटले की, 'शिक्षणात परिवर्तन घडवून आणण्यासाठी, पतंजलीने भारतीय शिक्षा मंडळ (BSB) सोबत मिळून पतंजली गुरुकुलम आणि आचार्यकुलम सारख्या

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी) २१ जून २०२५ वार शनिवार या दिवशी श्री श्री रविशंकर विद्यामंदिर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे सुरुवात प्रतिमा पूजनाने झाली. यासाठी शाळेचे अध्यक्ष पारगावकर सर सचिव शेख पाशा सर स्नेहा पारगावकर मॅडम मुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पत्की सर उपस्थित होते. त्यांनी यावेळी उपस्थितांना योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व सांगितले.इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी राजनंदिनी मगर हिने योगाचे महत्त्व सर्वांना पटवून दिले. इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी योग हो या गाण्यावर नृत्य सादर केले.शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता सूर्यवंशी मॅडम यांनी सूर्यनमस्कार घेतले आणि वृक्षासन ताडासन , शलभासन, पवन मुक्तासन इत्यादी आसणे कशी करायची याची सूचना विद्यार्थ्यांना दिली.त्यानंतर हरी ओम मेडिटेशन गुरुजींच्या आवाजात घेण्यातआले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका स्वाती पाटील मॅडम आणि सुषमा मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेतील शिक्षिका प्राजक्ता कुलकर्णी मॅडम यांनी केले. सर्व आसनाचे सादरीकरण विद्यार्थ्यांसमोर शाळेतील शिक्षिका मनीषा अंबुरे मॅडम आणि अश्विनी कुलकर्णी मॅडम दोघींनी केले . मोठ्या संख्येने महिला पालक, पुरुष पालक उपस्थित होते. शेवटीक्ष सर्व विद्यार्थ्यांना खाऊ देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षक वृंद व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.







## कुरव्यात दरोडेखोरास दुचाकी चोरीच्या गुन्हयात पकडले,




बीड । प्रतिनिधी दिनांक २०.०६.२०२५ रोजी महादेव भगवान दळवे, वय ५४ वर्ष, रा बालेपीर बीड यांनी पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, त्याचे राहते घरासमोरुन दुचाकी कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी हॅन्डल लॉक तोडुन चोरुन नेली आहे वगैरे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदरील दाखल गुन्हयाचे अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक बीड यांनी सदरील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या. त्या नुसार स्थानिक गुन्हे शाखेने गुन्हा उघडकीस आणण्याचे प्रयत्न सुरु केले असता दिनांक २०.०६.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, सदरचा गुन्हा हा अतुल विक्रम वाघमारे याने केला.

## बसस्थानकातून महिलेचे गंठण लंपास

मांजरसुंबा । प्रतिनिधी तालुक्यातील मांजरसुंबा बसस्थानकातून अज्ञात चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मिनीगंठण लंपास केल्याची घटना रविवार (दि.८) रोजी रात्री ८:३० च्या सुमारास घडली असून एकूण ८५,००० रुपयांचा ऐवज लंपास केल्याप्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात चोरीच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे.सुमित्रा विलास कुटे (वय ७०) रा.श्रीरामनगर बीड ह्या मांजरसुनबा बसस्थानकात बसची वाट पाहत थांबल्या असता त्यांच्या गळ्यातील २१ ग्रॅमचे वजनाचे मिनीगंठण अंदाजे किंमत ८५,००० रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी रविवार (दि.८) रोजी रात्री ८:३० च्या सुमारास लंपास केल्याची घटना घडली असून सुमित्रा कुटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुरुवार (दि.१९) रोजी नेकनूर (झेश्रळलश)पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला

## दुष्काळी मराठवाडा पाणीदार होणार कसा?

बीड । प्रतिनिधी दुष्काळी बीडला पाणीदार बनविण्यासाठी जलसंपदा विभागांकडुन १७ सिंचन प्रकल्प प्रकल्प मंजूर करण्यात आले होते.३ वर्षात प्रकल्पाचे काम सुरुच झाले नाही त्यामुळे जलसंपदा विभागाने त्याची प्रशासकीय मान्यता रद्द केली आहे.दुष्काळी बीडला हा मोठा धक्का मानला जात आहे.मात्र याचवेळी दुसरीकडे मराठवाड्यातील मोठ्या नद्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे २६५४ बंधारे बांधण्यात आलेले आहेत. परंतुयातील केवळ हिंगोली जिल्ह्यात सर्व बंधा-यांना गेट नसुन उर्वरित जिल्ह्यात पावसात येणारे पाणी गेट अभावी आले तसे वाहून जाते. मराठवाड्यात १९१९१ गेटची आवश्यकता असली तरी याकडे कोणीही लोकप्रतिनिधी अथवा प्रशासकीय अधिकारी गांभीर्याने पाहायला तयार नाही ही वस्तुस्थिती आहे. या बंधाऱ्याच्या गेटच्या दुरूस्तीसाठी ५२ कोटी रूपये



निधींची आवश्यकता असुन उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांनी निधीची तरतूद करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. मराठवाड्यात अनेक जिल्ह्यात डोंगररांगा आहेत.या ठिकाणाहून अनेक नद्यांचा उगम होतो. डोंगररांगात पडणारे पाणी आडवुन सिंचन क्षेत्र वाढवण्यासाठी मागील अनेक वर्षातून विविध सरकारने प्रयत्न केलेले आहेत. आजवर मराठवाड्यातील नद्यांवर २६५४ कोल्हापुरी पद्धतीने बंधारे बांधण्यात

## दुष्काळी मराठवाडा पाणीदार होणार कसा? २६५४ कोल्हापुरी बंधारे गेटविना ; अजितदादा बीड जिल्ह्यातील १७ सिंचन प्रकल्प रद्द केले निदान आता ५२ कोटी निधीची तरतूद तरी करा:- डॉ.गणेश ढवळे

--- बीड:- ( दि.२१) दुष्काळी बीडला पाणीदार बनविण्यासाठी जलसंपदा विभागांकडुन १७ सिंचन प्रकल्प प्रकल्प मंजूर करण्यात आले होते.३ वर्षात प्रकल्पाचे काम सुरुच झाले नाही त्यामुळे जलसंपदा विभागाने त्याची प्रशासकीय मान्यता रद्द केली आहे.दुष्काळी बीडला हा मोठा धक्का मानला जात आहे.मात्र याचवेळी दुसरीकडे मराठवाड्यातील मोठ्या नद्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे २६५४ बंधारे बांधण्यात आलेले आहेत. परंतुयातील केवळ हिंगोली जिल्ह्यात सर्व बंधा-यांना गेट नसुन उर्वरित जिल्ह्यात पावसात येणारे पाणी गेट अभावी आले तसे वाहून जाते. मराठवाड्यात १९१९१ गेटची आवश्यकता असली तरी याकडे कोणीही लोकप्रतिनिधी अथवा प्रशासकीय अधिकारी गांभीर्याने पाहायला तयार नाही ही वस्तुस्थिती आहे. या बंधाऱ्याच्या गेटच्या दुरूस्तीसाठी ५२ कोटी रूपये निधींची आवश्यकता असुन उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांनी निधीची तरतूद करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. सविस्तर माहितीस्तव ----- मराठवाड्यात अनेक जिल्ह्यात डोंगररांगा आहेत.या ठिकाणाहून अनेक नद्यांचा उगम होतो. डोंगररांगात पडणारे पाणी आडवुन सिंचन क्षेत्र वाढवण्यासाठी मागील अनेक वर्षातून विविध सरकारने प्रयत्न केलेले आहेत. आजवर मराठवाड्यातील नद्यांवर २६५४ कोल्हापुरी पद्धतीने बंधारे बांधण्यात आलेले आहेत. या बंर्धायावर कोट्यावधींचा खर्चही झालेला आहे. अर्थातच इतका खर्च केल्यास बंधा-यात पाणी साठणे आवश्यक आहे .परंतु असे होताना मराठवाड्यात तरी दिसत नाही. आजच्या घडीला हिंगोली वगळता २६३४ बंधा-यांना गेटची आवश्यकता आहे. २६५४ बंधाऱ्यांना ७९ , ७८१ गेट लागतात.यातील ६०,२६२ गेट आजच्या स्थितीत आहेत. परंतु १९,११९ गेटची कमतरता आहे. परिणामी प्रति बंधा-याला १ गेट नसले तरी संपूर्णपणे वाहून जाणे साहजिकच आहे. या बंर्धायांना गेट बसविण्यासाठी दरवर्षी निधीची तरतुदी होते. परंतु तरीही गेटची वाणवा कायम आहे. मराठवाड्यात सिंचनाच्या विषयाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. दरवर्षी निधी येत असुनही ही अवस्था असेल तर दुर्दैवी आहे .सरकारने मराठवाड्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांना केली आहे . मराठवाड्यात २६५४ कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यात २३५७३५ घसेमी



सिंचन क्षमता आहे.परंतु गेट नसल्याने हे पाणी वाहून जाते . पाणी वाहून गेल्याने जवळपास १४ हजार हेक्टरवरचे सिंचन क्षेत्र कमी झाले आहे. गेट असते तर किमान १० हजार शेतकऱ्यांची जमीन ओलिताखाली आलेली दिसली असती. आज या शेतकऱ्यांना पाण्याअभावी मजुरी करावी लागत आहे. बंधा-याचे गेट चोरीला जात असतील तर गुन्हे दाखल करण्यात कुचराई का?? ---- मराठवाड्यात आज गेट अभावी कोल्हापुरी बंधारे कामाचे राहिले नाहीत निरूपयोगी ठरले आहेत .हि अवस्था का झाली तर बंधा-याचे गेट चोरीला जातात अशी संबंधित विभागाचे अधिकारी कारण देतात.या एका गेटची किंमत मोठी असते.शिवाय चोरट्यांना शेतात काहीही अडथळा नसतो. त्यामुळे चोरी होते.परंतु बंधा-याचे गेट चोरीला गेले म्हणून संबंधित विभाग गुन्हे दाखल करण्यास कुचराई करतो. परीणामी चोरट्यांचे फावत चालले आहे. कोल्हापुरी बंधा-यावरील गेटची स्थिती -- जिल्हा लागणारे उपलब्ध आवश्यक संभाजीनगर १८,३३१ -१८५४३-२८३ जालना ११,२९५-५१५५-६१४० परभणी ३०४३-१८१५-१२२८ हिंगोली ७५५-७५५-०० नांदेड ३३३६-२४७६-६८० बीड २२४४-७५१-१४९१ लातुर ४४९३-३८२६-६६९ धाराशिव -३५७८४-२७३३४-८४४८ दुरूस्तीसाठी ५२ कोटींच्या निधीची आवश्यकता ----- मराठवाड्यातील २६५४ बंधा-यांना १९,११९ गेट बसविण्यासाठी २५ कोटी ४२ लाख ३९हजार रूपयांच्या निधीची आवश्यकता आहे. यात संभाजीनगर ३९ लाख, जालना ६१४, परभणी १३५ , हिंगोली ००, नांदेड १३२ , बीड १५८, लातुर ७४.४१, धाराशिव १३८९ असे एकुण ५२ कोटी ४२ लक्ष रूपयांच्या निधीची आवश्यकता आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com